# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ


**(महाराष्ट्र शासनाचे वैद्यानिक महामंडळ)**

32 वा मजला, सेंटर-1 बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,
मुंबई-400005. **दूरध्वनी:** (022) 22151847 **फॅक्स:** (022) 22151867
**ई मेल:** info.mahasecurity@maharashtra.gov.in **वेबसाईट:** http://www.mahsecurity.gov.in


## 1000 पुरुष सुरक्षा रक्षकांची कंत्राटी पध्दतीवर नेमणुक प्रतीक्षाधीन यादीसाठी जाहिरात

### (अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख 20/12/2017 सायं 17.00 वाजेपर्यंत)

### (अर्जाचे प्रक्रिया शुल्क रु.200/- परिच्छेद 9 पहा)

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, **कंत्राटी पध्दतीवर** तसेच खालील अटी व शर्तीवर **1000 पुरुष सुरक्षा रक्षकांच्या** प्रतीक्षाधीन यादीकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे.

**पात्रतेचे निकष आणि अटी व शर्ती**

| अ. क्र. | निकष | पुरूष उमेदवार |
|---|---|---|
| 1 | वयोमर्यादा | 18 ते 28 वर्षे दि. 01/12/2017 रोजी [30/11/1989 ते 30/11/1999) दरम्यान जन्मलेले उमेदवारच पात्र] |
| 2 | उंची, वजन/ छाती | 1. उंची - 170 से.मी. पेक्षा कमी नसावी.<br>2. वजन - 60 कि.ग्रॅ. पेक्षा कमी नसावे.<br>3. छाती - न फुगवता 79 से. मी. वा जास्त.<br>फुगवून - किमान 5 से.मी. [Expansion] |
| 3 | शैक्षणिक पात्रता | उच्च माध्यमिक शालान्त परिक्षा HSC [12 वी] पास. |
| 4 | अधिवास निकष | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| 5 | शारिरीक चाचणी | 1. 1600 मीटर धावणे. [50 गुण] |
| 6 | 12वी च्या गुणांचे भार प्राधान्य [First attempt] [Waitage] | 12वी परिक्षेत 70% पेक्षा अधिक गुण -50 गुण<br>12वी परिक्षेत 60% ते 70% गुण -40 गुण<br>12वी परिक्षेत 50% ते 60% गुण -30 गुण<br>12वी परिक्षेत 40% ते 50% गुण -10 गुण<br>12वी परिक्षेत 40% पेक्षा कमी गुण -00 गुण |
| 7 | **कंत्राटानुसार मोबदला - मासिक रु. 14,000/-<br>[Less-EPF+ESIC+PT= फक्त रुपये 12,362/-]** | |

**2. कर्तव्याच्या मुख्य अटी व शर्ती**

**2.1. कर्तव्य- सुरक्षा रक्षक म्हणून महाराष्ट्रातल्या कोणत्याही ठिकाणी विशेषत: मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई येथे काम करण्यास इच्छुक उमेदवारांनीच अर्ज करावेत.**

**2.2. सदरचे कर्तव्य हे कंत्राटी स्वरुपाचे राहील. सुरक्षा रक्षकांबरोबरच्या कंत्राटास भविष्यात कधीही कायम स्वरुप येणार नाही.**

2.3. कंत्राटा दरम्यान सुरक्षा रक्षकास कोणत्याही राजकीय, कामगार अथवा व्यवसायिक संघटनेचा **[Union]** सदस्य होता येणार नाही, अथवा संघटना स्थापन करता येणार नाही. तसेच वर नमुद अथवा इतर कोणत्याही संघटनेच्या कसल्याही प्रकारच्या कारवायांमध्ये भाग घेता येणार नाही.

2.4. महामंडळाकडे सुरक्षेची मागणी करणाऱ्या आस्थापना **[Clients]** यांच्या मागणी नुसार कर्तव्य देण्यात येईल.

2.5. कोणत्याही उमेदवाराचे कंत्राट, कोणत्याही दिवशी, कोणतीही पूर्व सुचना, आणि तसेच कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा **[Terminate]** हक्क महामंडळाकडे राहील.

2.6. प्रतीक्षाधीन यादीवरील निवड झालेल्या उमेदवारास 2 आठवडयांचे प्रशिक्षण दिले जाईल. या प्रशिक्षणासाठी येणारा खर्च रु. 6000/- उमेदवारास प्रशिक्षणास जाण्यापूर्वी ठेव म्हणून **[Deposit]** महामंडळाकडे [DD/POfvg MSSC] द्वारा जमा करावा लागेल. सदरची रक्कम सेवेत रूजू झाल्यानंतर 6 महिन्यानंतर प्रत्येक महिन्याला रु. 1000/- प्रमाणे उमेदवारांस परत करण्यात येईल. प्रशिक्षणास हजर झाल्यानंतर सदरची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच प्रशिक्षण सोडून गेल्यास ही रक्कम परत केली जाणार नाही.

3. सुरक्षा रक्षकांना चाचणीस येणेसाठी कोणतेही भत्ते अनुज्ञेय नसतील.

4. सुरक्षा रक्षकांनी महामंडळासोबतच्या करारात असतांना कोणतीही नोकरी अथवा धंदा, **[पुर्णवेळ किंवा अंश कालीन]** करता येणार नाही.

5. महामंडळाबरोबर कंत्राट झाल्यानंतर उमेदवारांस राज्य कामगार विमा योजनेचे **[ESIC]** लाभ देय होतील.

6. **पात्र व इच्छुक उमेदवारांनी http://www.mahasecurity.gov.in/applicationform.php या वेब - लिंकवर online अर्ज भरावा. ही जाहिरात आणि भराव्याच्या अर्जाचा नमूना www.mahasecurity.gov.in या वेब साईटवर Advertisement या tab मध्ये उपलब्ध आहे. आपले अर्ज दि. 20/12/2017 रोजी सायं. 17.00 वाजेपर्यंत सादर करावे.**

**7. सदर अर्ज कोठल्याही smart phone वरून/internet असलेल्या computer वरुन सदर वेब लिंकद्वारे भरता येईल. दुसऱ्या कोठल्याही पध्दतीने अर्ज पाठवू नयेत.**

8. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या खालील बँक अकाऊंटमध्ये फक्त **NEFT** द्वारे भरावे. **''सदर आकऊंटमध्ये कॅशमध्ये भरु नये.''**

9. अर्जासोबत भरावयाचे **प्रक्रिया शुल्क** रु. 200/- हे वेबलिंकवर अर्ज भरण्यापूर्वी **NEFT द्वारे** महामंडळाच्या HDFC बँकमधील खाली नमुद खात्यामध्ये केवळ **NEFT** द्वारेच भरावेत.

10. **Bank Details :- HDFC BANK, HDFC A/c No.50100150433559, BRANCH - INDUSTRY HOUSE, IFSC Code - HDFC0000501** महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या नावाने **NEFT** करावे.

11. **NEFT** चा **UTR Number [Unique Transaction Reference Number]** वेबलिंकवरील अर्जामध्ये न चुकता नमुद करावा. प्रक्रिया-शुल्काशिवाय सादर केलेले अर्ज रद्द समजले जातील.

12. प्रतीक्षाधीन यादी निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये तसेच वेळापत्रकात बदल करण्याचा अधिकार महामंडळास असेल.

**13. प्रतीक्षाधीन यादीच्या संख्येत वाढ/ घट करण्याचा अधिकार महामंडळाकडे राहील.**

**14. अर्ज भरण्याबाबतच्या अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र.8433902971 / 022-22151670 वरती संपर्क साधावा. इतर दुरध्वनी वर संपर्क साधु नये.**

**Size : 8 (W) x 25 (H)**